**रे. मु. नं. २७/२०२४**
**शेख रफिक वि. सै. जाबिर**
**निशाणी १४ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ शेख रफिक शेख अजिज याची उलटतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. कुळकर्णी यांच्या मार्फत</u> —**

५. वाद मिळकतीच्या पुर्वीच्या मालकाचे नांव गणेशराव ज्ञानदेवराव ठाकरे असे होते. वाद मिळकत सदर गणेशराव ठाकरे याचेकडुन विकत घेण्यापुर्वी तिचा मालक गणेशराव ठाकरे असल्याबाबत मी नोंदणी रजिस्टर पाहिले होते. सदर रजिस्टर ७/१२ उता—यांचे होते. साक्षीदार पुढे सांगतो की, मी खरेदी खत देखील पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, गणेशराव ज्ञानदेवराव ठाकरे वाद मिळकतीचे पुर्वीचे मालक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गणेशराव याचे नावाने वाद मिळकतीचा कधीही ७/१२ उतारा नव्हता.

६. मी कामुंजा, पो. वलगांव, ता. जि. अमरावती येथे राहतो. अकोट येथे माझी सासरवाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत व माझे सासरचे लोकं एकाच भागात राहतात. साक्षीदार सांगतो की, माझे सासरचे लोकं गणगणे शाळेच्या समोर राहतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सासरी नेहमी येणे—जाणे करतो.

७. मी गणेशराव ठाकरे याचेकडुन वाद मिळकतीचे क्षेत्रफळ मोजुन विकत घेतले होते. मी वाद मिळकत सरकारी मोजणी करवुन विकत घेतली आहे. मी वाद मिळकतीचे क्षेत्रफळ मोजुन विकत घेतल्याबाबत दस्त अभिलेखावर दाखल केले आहेत. वाद मिळकतीची सरकारी मोजणी केल्याबाबत दस्त मी अभिलेखावर दाखल केले आहेत.

८. आता मला दाव्याची संचिका दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीची सरकारी मोजणी झाल्याबाबत दस्त मी दाखल केलेले नाहीत.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद मिळकत मोजणी करून विकत घेतली व त्याची सरकारी मोजणी झाली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने वाद मिळकतीत अतिक्रमण केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गणेशराव ज्ञानदेवराव ठाकरे हा वाद मिळकतीचा मालक होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गजानन उकर्डाजी भारंबे हा वाद मिळकतीचा मालक होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने गजानन उकर्डाजी भारंबे याचेकडुन वाद मिळकत विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने गजानन उकर्डाजी भांरबे याचेकडुन वाद मिळकत दि. ०६/०६/२०११ रोजी विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत दि. ०६/०६/२०११ पासनु प्रतिवादीच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवर प्रतिवादीने किराणा दुकानासहीत चार खोल्यांचे बांधकाम केलेले आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने वाद मिळकतीत टिनाचे शेड टाकुन तात्पुरत्या कचच्या भिंती बांधुन अतिक्रमण केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाद मिळकत मी विकत घेतली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०६.०२.२०२६
अकोट

(ए.ए. माळी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.